# सुजाता बोरकर यांची कार्यकारी संचालकपदी नियुक्ती

**पुणे (दै. संध्या) :**

## ■ कोरोना महामारी व्यत्ययानंतर फौंडेशनतर्फे विविध सामाजिक उपक्रमांची ग्रामीण भागात पुन्हा सुरुवात

शिक्षण, आरोग्य व सामाजिक कल्याण या क्षेत्रात भारतातील अनेक राज्यात ना नफा तत्वावर काम करणाऱ्या इंडियाआशा फौंडेशन या सामाजिक संस्थेने सामाजिक क्षेत्रातील अनुभवी व्यक्ति सुजाता बोरकर यांची उत्तर पश्चिम महाराष्ट्र शाखेच्या कार्यकारी संचालकपदी नियुक्ती केल्याची घोषणा केली.

बोरकर यांनी दोन दशकाहून अधिक काळापासून तळागाळातील विविध सामाजिक समस्या हाताळण्याचे काम केले असून एक दशकाहून अधिक काळापासून त्या इंडियाआशा फौंडेशनसोबत काम करत आहे. त्यांची सामाजिक बदलाची आवड लक्षात घेऊन इंडिया आशा फौंडेशनने अनेक प्रभावशाली सामाजिक उपक्रम सकारात्मसक परिणामांसह सुरु केले.

सुजाता बोरकर यांच्या उत्तर पश्चिम महाराष्ट्र शाखेच्या कार्यकारी संचालकपदी झालेल्या नेमणुकीमुळे इंडिया आशा फोंडेशनतर्फे अनेक सामाजिक उपक्रम कोरोना महामारीच्या व्यत्ययानंतर पुन्हा नव्या जोमाने सुरु होत आहेत.

आरोग्य, शिक्षण आणि तत्सम क्षेत्रामध्ये मूलभूत काम करणाऱ्या इंडिया आशा फौंडेशनच्या उत्तर पश्चिम महाराष्ट्र शाखेच्या कार्यकारी संचालकपदी नेमणूक होणे हा माझा सन्मान आहे. अनेक राज्यातील ग्रामीण व आदिवासी भागातील समाज जीवनावर आमच्या या प्रयत्नांनी सखोल परिणाम झाला आहे.